महावितरण
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा.क्र. औसंवि/ब/ No 22595 दिनांक : 13 AUG 2019

प्रति,
क्षेत्रीय कार्यालयातील सर्व मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता, महावितरण.

**विषय :** कामगार राज्य विमा योजना व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व संकिर्ण तरतूदी अधिनियम अंतर्गत करावयाच्या सुधारीत कपातीबाबत. (Amendments)

**संदर्भ :** प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३६ दि. ०२/०५/२०१६.

************

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये कंत्राटी पध्दतीवर कामगारांच्या सेवा घेण्यासंदर्भातील निविदा / कंत्राट याबाबतचे सुधारीत निर्देश तसेच कामगारांना वेळेत व त्यांचे बँक खात्यामध्ये किमान वेतन व अनुषंगीक भत्ते मिळण्यासाठी सुधारीत कार्यपध्दती प्रसारीत करण्यात आलेली आहे.

कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनुसार कामगारांची सेवा उपलब्ध करुन घेताना विविध कामगार कायद्यान्वये बंधनकारक असणाऱ्या तरतुदींची योग्य अंमलबजावणी करुन नियमानुसार किमान वेतन व अन्य देणी कामगारांना अदा करणे आवश्यक आहे.

आता, कामगार राज्य विमा योजना अधिनियम व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व संकिर्ण तरतूदी अधिनियम यामध्ये सुधारणा (Amendment) झाली असून खालीलप्रमाणे सुधारीत तरतूदीनुसार वर्गणी कपात करण्यात यावी.

**(अ)** श्रम व रोजगार मंत्रालय (Ministry of Labour & Employment), भारत सरकार यांची अधिसूचना दि. १३ जून २०१९ अन्वये कामगार राज्य विमा योजना योगदान (Contribution) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

**ज्या ठिकाणी कामगार राज्य विमा योजना लागू आहे अशा ठिकाणी कामगार राज्य विमा योजना वर्गणी (मुळवेतन+विशेषभत्ता+इतर भत्ते यावर कपात).**

| तपशील | प्रचलित दर | सुधारीत दर |
|---|---|---|
| कंपनीच्या वतीने कंत्राटदाराने भरावयाच्या वर्गणीची टक्केवारी | ४.७५% | ३.२५% |
| कामगाराची वर्गणी | १.७५% | ०.७५% |
| एकूण कामगार राज्य विमा योजना वर्गणी | ६.५०% | ४.००% |

उपरोक्त सुधारीत तरतूद **दि. ०१/०७/२०१९ पासून** लागु राहतील.



Scanned by CamScanner

**(ब)** श्रम व रोजगार मंत्रालय (Ministry of Labour & Employment), भारत सरकार यांची अधिसूचना दि. २१ मे २०१८ अन्वये भविष्य निर्वाह निधीचे प्रशासकीय शुल्क मध्ये खालीलप्रमाणे कपात केलेली आहे.

**कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व संकिर्ण तरतूदी अधिनियम अंतर्गत सुधारीत तरतूद (Amendment).**

| तपशील | प्रचलित दर | सुधारीत दर |
|---|---|---|
| भविष्य निर्वाह निधीचे प्रशासकीय शुल्क, (मुळवेतन+विशेषभत्ता प्रमाणे) | ०.६५% | ०.५०% |

उपरोक्त सुधारीत तरतूद **दि. ०१/०६/२०१८ पासून** लागु राहतील.

सबब, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३६ दि. ०२/०५/२०१६ मधील इतर तरतूदी अबाधीत असून उपरोक्तपणे (अ) व (ब) मध्ये दिलेल्या सुधारीत तरतूदींची तातडीने अमलबजावणी करण्यात यावी.

**(चंद्रशेखर येरमे)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

प्रत :-

१. मुख्य महाव्यवस्थापक (मासं), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
   - सांघिक कार्यालय स्तरावरील कंत्राटी कामगारांची व कंपनीच्या वतीने कंत्राटदार आस्थापनांनी संविधानिक देणी संदर्भात करावयाच्या कपातीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

२. उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, भांडूप / कल्याण / रत्नागिरी / नाशिक / कोल्हापूर / पूणे / बारामती / जळगांव / औरंगाबाद / नांदेड / लातूर / अकोला / अमरावती / नागपूर / चंद्रपूर / गोंदिया.



Scanned by CamScanner